425

# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,पुणे.

(गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन)
चौथा मजला,काकडे बीझ् आयकॉन, ई-स्क्वेअरजवळ,
अशोकनगर, गणेशखिंड रोड, शिवाजी नगर, पुणे-४११०१६.
दूरध्वनी क्रमांक : (O) : ०२०-२५५७७९९१
ईमेल-: srapune@yahoo.in वेबसाईट: www.srapune.gov.in

---

जा.क्र. झोपुप्रा/तां.१/अभोप्र/मा.क्र.२०७/ ८१२ /२०२१ दि. २३/ ०६/२०२१.

Slum Rehabilitation Authority Technical Department APPROVED Pune-Pimpri-Chinchwad

## अंशतः भोगवटा प्रमाणपत्र ( विंग B पुनर्वसन घटक )

वाचा - १) मूळ बांधकाम परवानगी जा.क्र. झोपुप्रा/१९२६/२०१७ दि. ०८/१२/२०१७.
२) सुधारित बांधकाम परवानगी जा.क्र. झोपुप्रा/१२८५/२०२० दि. १७/१०/२०२०.
३) विकसक यांचा भोगवटा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा दि ०६/०४/२०२१ रोजीचा विनंती अर्ज.
४) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, झो.पु.प्रा, पुणे यांचेकडील दि.२१/०६/२०२१ रोजीच्या सादर टिपनीन्वये मान्यता.

---

महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९, कलमे २५३/२५४ व महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ कलम ४५ प्रमाणे सि.स.नं. १७/४,स.नं ५०० व ५०१ पैकी **कोंढवा खुर्द, पुणे** येथिल झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमधील इमारतीस या कार्यालयाकडून जा.क्र. झोपुप्रा/१९२६/२०१७ दि. ०८/१२/२०१७ अन्वये मुळ बांधकाम परवानगी व जा.क्र. १२८५ दि. १७/१०/२०२० नुसार सुधारित बांधकाम परवानगी देणेत आली आहे. सदर बांधकाम परवानगी प्रमाणे पुनर्वसन इमारतीचे काम पूर्ण झाल्याने, सदर पुनर्वसन इमारतीमधील सदनिकांसाठी भोगवटा पत्र मिळण्याबाबत विकसक मे.एम्पायर कन्स्ट्रक्शन्स यांनी उपरोक्त वाचा क्र. ३ मध्ये नमूद केले नुसार विनंती अर्ज केलेवरुन खालीलप्रमाणे तपशीलानुसार पुनर्वसन इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा, पुणे यांनी दि. २१/०६/२०२१ रोजीच्या मान्य टिपणीन्वये देणेत येत आहे.

विंग B (पुनर्वसन घटक)

| अ.क्र. | मजले | सदनिका तपशिल | सदनिका / शॉप क्र. (पुनर्वसन घटक) | एकूण सदनिका |
|---|---|---|---|---|
| १ | लोअर ग्राउंड फ्लोअर | पार्किंग | पार्किंग | पार्किंग |
| २ | अप्पर ग्राउंड फ्लोअर | सोसायटी ऑफिस + टॉयलेट + पार्किंग | सोसायटी ऑफिस + टॉयलेट + पार्किंग | सोसायटी ऑफिस + टॉयलेट + पार्किंग |
| ३ | पहिला मजला | | सदनिका क्र. १०१,१०२,१०३,१०४,१०५,१०६ | ०६ |
| ४ | दुसरा मजला | | सदनिका क्र. २०१,२०२,२०३,२०४,२०५,२०६ | ०६ |
| ५ | तिसरा मजला | | सदनिका क्र. ३०२, ३०४,३०५,३०६ | ०४ |
| ६ | चौथा मजला | | सदनिका क्र. ४०१,४०२,४०३,४०४,४०५,४०६ | ०६ |
| ७ | पाचवा मजला | | सदनिका क्र. ५०१,५०२,५०३,५०४,५०५,५०६ | ०६ |
| ८ | सहावा मजला | | सदनिका क्र. ६०१,६०२,६०३,६०४,६०५,६०६ | ०६ |
| ९ | सातवा मजला | | सदनिका क्र. ७०१,७०२,७०३,७०४,७०५,७०६ | ०६ |
| १० | आठवा मजला | | सदनिका क्र. ८०६ | ०१ |
| एकुण संख्या | | | ४१ | ४१ |

पुनर्वसन घटक:-
एकुण गाळे - निरंक
एकुण सदनिका - ४१

एकुण - पार्किंग + ४१ सदनिका + सोसायटी ऑफिस + टॉयलेट

Slum Rehabilitation Authority ★ Technical Department APPROVED ★ Pune-Pimpri-Chinchwad Area

प्रस्तुत प्रकरणी भोगवटा देणेकामी खालील नमुद अटी व शर्तीस अधीन राहुन B इमारतीतील घटकासाठी अंशत: भोगवटा प्रमाणपत्र देणेत येत आहे.

423

अटी :-

१) प्रस्तुत बांधकाम भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झालेनंतर सदर इमारतीमध्ये वा भूखंडामध्ये केलेले कोणतेही बांधकाम अनधिकृत समजण्यात येईल आणि त्या बाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६चे कलम ५२ ते ५६ नुसार जरूर ती कार्यवाही करण्यात येईल.

२) बांधकाम भोगवटा प्रमाणपत्रासाठी सादर केलेली कागदपत्रे चुकीची अथवा दिशाभूल करणारी असल्याचे भविष्यात कोणत्याही वेळेस आढळल्यास दिलेले बांधकाम भोगवटा प्रमाणपत्र आपोआप रद्द समजण्यात येईल.

३) प्रकरणी भविष्यात कोणतीही शासकीय देणी / येणे देय असल्याबाबत आढळून आल्यास अगर विविध देय शुल्कांच्या परिगणनेमध्ये तफावत आढळून आल्यास त्याप्रमाणे फरकाची रक्कम भरणे विकसकावर बंधनकारक राहील.

४) स्थानिक संस्था कराबाबत व उपकराबाबत शासन धोरण व नियमानुसार आवश्यक ती पुर्तता करणे व सर्व अटी / शर्तींचे पालन करणे विकसकांवर बंधनकारक राहील.

५) विषयांकित योजना रस्तारूंदीकरणाखालील / आरक्षणाखालील क्षेत्र म.न.पा. पुणे यांचेकडे हस्तांतरीत करून तसे, उर्वरित टी.डी.आर. मागणीपूर्वी, या कार्यालयास अवगत करावे.

६) इमारतीचे सर्व सिमा भिंत बांधकाम, वृक्ष लागवड करणे योजनेतुन निर्माण होणारा टीडीआर मागणीपूर्वी पूर्ण करून सामासिक अंतराचे संपूर्ण क्षेत्र खुले ठेवणे बंधनकारक आहे.

७) सदर झोपडपट्टी योजनेतील पुनर्वसन सदनिकांचे वाटप, भोगवटापत्र प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांमध्ये सोडतपद्धतीने वितरीत करून घेणे आवश्यक आहे.

८) तसेच उर्वरित किरकोळ राहिलेली कामे झोपडीधारकांना ताबा देणेपुर्वी पुर्ण करणे आवश्यक आहे,तसे न झाल्याचे निदर्शनास आलेस योजनेचा टीडीआर अदा करणेत येणार नाही.

९) सदर योजनेसाठी लागू होणारे शुल्क, जसे देखभाल खर्च, आणि पायाभूत सुविधा शुल्काची एकूण रक्कम (१००% रक्कम) टी.डी.आर. मागणीपूर्वी अदा करणे आवश्यक आहे.

१०) सदर योजनेकरिता विकसक यांनी सादर केलेल्या ना-हरकत प्रमाणपत्रानुसार पाणी पुरवठा विभाग/ग्रामपंचायतीने पाण्याचा पुरवठा न केल्यास सदर योजनेतील सदनिका हस्तांतरणापुर्वी पाण्याची आवश्यक ती पुर्तता स्वखर्चाने करणे विकसकावर बंधनकारक राहील.

११) अतिरिक्त (विक्री घटक) क्षेत्राबाबतचा मोबदला विकसक यांनी त्यांचे जबाबदारी व तसेच भविष्यात या संदर्भात कोणतीही अडचण उद्भवल्यास त्याची सर्वस्व जबाबदारी विकसक आणि वास्तु विशारद यांची राहिल. तसेच या संदर्भात झोपुप्रा, पुणे कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.

१२) प्रकल्पाअंतर्गत योजना क्षेत्रातील खुली जागा आणि सार्वजनिक रस्त्याअंतर्गत क्षेत्र सर्व रहिवाशांच्या सार्वजनिक वापराकरिता निरंतर उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे.

१३) वरील नमूद पुनर्वसन इमारतीचे काम पुर्ण झालेकामी झोपडीधारकांचे पुनर्वसन करणे क्रमप्राप्त असलेने व तसेच दि.१७/०२/२०२१ रोजीच्या मा.दिवाणी न्यायालयाच्या आदेशास अधिन राहून सदर मिळकती संदर्भात कोणत्याही त्रयस्त व्यक्तीच्या किंवा त्रयस्त पक्षाकाराच्या लाभात कोणत्याही स्वरूपात सदर मिळकतीबाबत हक्क व अधिकार निर्माण करता येणार नाही. तसेच

भविष्यात मे.न्यायालयाने विकसकाविरूध्द कोणतेही आदेश पारीत केल्यास त्य बाबतची योग्य ती पुर्तता व पालन करणे मे.एम्पायर कन्स्ट्रक्शन्स यांच्यावर बंधनकारक राहिल.

१४) त्याचप्रमाणे सदर दाव्यामध्ये विषयांकित मिळकतीबाबत भविष्यात वादी यांनी त्यांचे हक्क व अधिकार साबीत केल्यास त्या संदर्भातील सर्व प्रकारची नुकसान भरपाई देण्याची सर्वस्वी जबाबदारी विकसक म्हणून केवळ एम्पायर कन्स्ट्रक्शन्स यांची राहील तसेच त्यास झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,पुणे कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.

Slum Rehabilitation Authority Pune-Pimpri-Chinchwad Area Technical Department APPROVED

२३।६।२०२१

प्र. सहाय्यक संचालक नगररचना
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.
22/06/2021

प्रत :- १) मे.एम्पायर कन्स्ट्रक्शन
कॅसिया कोर्ट, फा. प्लॉट नं. ३०२, नॉर्थ मेन रोड,डि- लेन, कोरेगाव पार्क, पुणे-०१.

२) वास्तुविशारद प्राईड डिजाईनर्स,
लाल देवल सोसायटी युनिट नं.बी-१० कॅम्प पुणे-०१.

३) तहसिलदार, ताबा विभाग, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे, यांना माहितीस्तव सादर.

४) विधी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे, यांना माहितीस्तव सादर.

५) संगणक अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे, यांना संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यासाठी अग्रेषित.